# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301

Email ID- rdc1osmanabad@gmail.com


संदर्भ:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DIsM-1 दि. 31 मे 2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 31.05.2020.
6. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DIsM-1 दि. 04 जून 2020.
7. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 09.06.2020.
8. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DIsM-1 दि. 25 जून 2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 26/06/2020.

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ 4 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार संदर्भ क्र. 5 अन्वये या कार्यालयाने दि. 30 जून 2020 पर्यंत वाढविण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत आदेश पारित केला आहे. ज्याअर्थी संदर्भ क्र. 8 अन्वये महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र. 4 च्या आदेशात दुरुस्ती करुन दुरुस्ती आदेश पारित केला आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 8 चे अनुषंगाने संदर्भ क्र. 5 चे या कार्यालयाचे आदेशात खालीलप्रमाणे दुरुस्ती करीत आहे.

1. मुद्दा क्र. 6 VIII मध्ये दुरुस्ती करुन तो खालीलप्रमाणे वाचण्यात यावा.

**6) खालील बाबींना जिल्ह्यामध्ये प्रतिबंध राहील.**

**VIII.** राज्य सरकारच्या परवानगीशिवाय केशकर्तनालये, स्पाज, सलून्स, ब्यूटी पार्लर्स.



Scanned by CamScanner

2. मुद्दा क्र. 5 मध्ये खालील नमूद उपमुद्दा VII चा समावेश करण्यात येत आहे.

**5) खालील बाबी जिल्ह्यामध्ये चालू राहतील.**

VII) दि. 27 जून 2020 पासून केशकर्तनालये, सलून आणि ब्युटी पार्लर्स खालील अटींवर चालू करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

a) केवळ निवडक सेवा जसे की केस कापणे (haircut), केस रंगविणे (dyeing hair), वॅक्सिंग (waxing), थ्रेडींग (threading) इ. ला परवानगी आहे. त्वचा संबंधित सेवांना सध्या परवानगी दिली जाणार नाही. हे दुकानात स्पष्टपणे प्रदर्शित केले जावे.

b) केशकर्तनालये, सलून आणि ब्युटी पार्लर्स येथील कर्मचा-यांनी नेहमी ग्लोव्हज, ॲप्रन व मास्क/स्वच्छ रुमाल वापरणे बंधनकारक आहे.

c) केशकर्तनालये, सलून आणि ब्युटी पार्लर्स मध्ये प्रत्येक सेवेनंतर कामाची सर्व ठिकाणे (खुर्ची) स्वच्छ (Sanitize) करणे बंधनकारक आहे. सर्व सार्वजनिक जागा (Common areas) व मजले (floors) प्रत्येक दोन तासांनंतर स्वच्छ (Sanitize) करणे करणे बंधनकारक आहे.

d) केशकर्तनालये, सलून आणि ब्युटी पार्लर्स मध्ये प्रत्येक ग्राहकासाठी नष्ट होणारे (Disposable) टॉवेल्स/नॅपकीन्स वापरणे आवश्यक आहे. नष्ट न होणारी साधने/उपकरणे प्रत्येक सेवेनंतर स्वच्छ (Sanitize) व निर्जतुक (Sterilize) करणे आवश्यक आहे.

e) केशकर्तनालये, सलून आणि ब्युटी पार्लर्स च्या प्रत्येक दुकानात सुचनाफलकाद्वारे वरील सर्व खबरदारीच्या सूचना ग्राहकांना निदर्शनास आणुन दिल्या जातील.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
6. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
7. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
8. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
9. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
10. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
11. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
12. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

26/6/20
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRIGT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner